# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेसनोट** **दि.०७/०२/२०२०**

**लहान मुलांचे अश्लिल व्हीडीओ शेअर करणा-या तीघांना पिंपरी-चिंचवड सायबर सेलने केली अटक**

The National Center for Missing and Exploited Children(NCMEC) यांच्यामार्फत National Crime Record Bureau, MHA, NewDelhi कडुन Child Pornography/Rape/Gang Rape/obscence content बाबतच्या गोपनिय टिप लाईन्स विशेष पोलीस महानिरीक्षक, तथा नोडल अधिकारी NCCRP Portal महाराष्ट्र सायबर,मुंबई यांचेकडे प्राप्त झाल्या होत्या. सदरच्या टिपलाईनचे वर्गिकरण करून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडे ३१ टिपलाईन पाठविल्या होत्या. त्यामध्ये लहान मुलांचे अश्लिल व्हीडीओ फेसबुकवर अपलोड व शेअर केल्याचे समोर आले आहे. त्यापैकी १४ टिपलाईन्सवरून १२ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. इतर टिपलाईन्समध्ये तांत्रिक विश्लेषण करुन कार्यवाही करण्यात येणार आहे.

दाखल असलेल्या १२ गुन्हयांचे तांत्रिक विश्लेषण करुन माहिती प्राप्त केली असता खालील गुन्हयांमध्ये सायबर सेलकडून आरोपी ताब्यात घेण्यात आलेले आहेत.

१)सांगवी पोलीस स्टेशन येथे दि.०५/०१/२०२० रोजी गु.रजि. नं. **१०/२०२०**, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ कलम ६७ (ब), बालकांचे लौंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम-२०१२ कलम- १४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने नमुद टिपलाईनमध्ये तांत्रिक विश्लेषण केले असता इसम नामे **केवा परबाराम देवासी वय २२ वर्ष रा. बालाजी कलेक्शन, राधाकृष्ण गार्डन शेजारी पिंपळे गुरव, सांगवी,** येथून ताब्यात घेऊन त्याचेकडे चौकशी केली असता त्याने टिपलाईनमध्ये नमुद व्हीडीओ व्हायरल केल्याचे निष्पण्ण झाल्याने त्यास पुढील कार्यवाहीकरीता सांगवी पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले.

२)चाकण पोलीस ठाणे येथे दि.०६/०२/२०२० रोजी टिपलाईन नुसार गुन्हा रजि. नं.**१०६/२०२०** माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ कलम ६७ (ब), बालकांचे लौंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम-२०१२ कलम १४ अन्वये इसम नामे **किशोर भानुदास वाघमारे, वय -२४ वर्षे, रा. सावतामाळी नगर, दावडा मळा, चाकण** यांस ताब्यात घेवुन पुढील कार्यवाहीकामी चाकण पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

३)चाकण पोलीस ठाणे येथे दि.०६/०२/२०२० रोजी टिपलाईननुसार गुन्हा रजि. नं.**१०७/२०२०** माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ कलम ६७ (ब), बालकांचे लौंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम-२०१२ कलम १४ अन्वये गुन्हा दाखल करून चाकण पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये रहात असलेला इसम नामे **अजय माताप्रसाद सागर वय- २५ वर्षे, रा. बापु यळवंडे यांचे भाडयाचे खोलीत निघोजे, चाकण ता. खेड जि.पुणे** यांस ताब्यात घेवुन पुढील कार्यवाहीकामी चाकण पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा. श्री.संदीप बिष्णोई सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री.रामनाथ पोकळे सो, पोलीस उप-आयुक्त मा.श्री. सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त मा.श्री. श्रीधर जाधव सो यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधाकर काटे, सहा.पो.नि. विजय गरुड, कर्मचारी अतुल लोखंडे, भास्कर भारती, नितेश बिच्चेवार, मनोज राठोड, पोपट हुलगे, प्रदिप गायकवाड, विशाल गायकवाड, युवराज माने, कृष्णा गवळी, वैशाली बर्गे, स्वप्नाली जेधे यांचे पथकाने केली आहे.

(**सुधाकर काटे**)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सायबर सेल, गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड